3852

~~पु~~ मराठी- संस्कृत. पुराण.

ग्रं.नं. ६७

।लिंगपुराणांतर्गत शैवागम

890। पु. ९३

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(1)

॥ अथ लिंगपुराणांतर्गतशैवागम प्रारंभः ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

श्रीगणेशायनमः ॥ ॥ शैवागमाचा अर्थबोध सर्व लोकांस सुगम व्हावयाकारणे माहाराष्ट्र भाषेकरून याची टीका लि
हितो॥या शैवागमाच्याठायीं शिवपांचाल ब्रह्मपांचाल व उपपांचाल ह्मणोन त्रिविध पांचालाचा सृष्ट्यादिक सर्व वि
स्तार लिहिला पाहिजे यास्तव ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र ह्मणोन जे च्यार वर्ण त्यांची व वेदाची सृष्टि प्रथम लिहिता
त॥त्यांत वेद व ब्राह्मण यांचा सृष्टिक्रम सांगतात॥ ॥ श्लोक ॥ शिववक्राच्चवेदोभूल्ललाटाद्ब्राह्मणस्तथा ॥ शिवक्रिया
ब्राह्मणानांशिवधर्मःपरायणः॥१॥ ॥ टीका ॥ सृष्टीकाळीं जगदीश्वराचे इच्छेकरून महादेवाचे मुखापासून ऋग्यजुः
सामाथर्वात्मक भेदचतुष्टयसंपन्न वेद होता झाला॥त्याच्या ललाटापासून ब्राह्मण झाले॥त्या ब्राह्मणानीं वेदोक्त शि
वप्रीतिकर यजनादि षट्कर्म करावें॥आणि शिवप्रीतिकर धर्म ब्राह्मणास स्वर्गापवर्गदायक आहे॥१॥ ॥श्लोक॥शि
वस्यबाहुजःक्षत्रीरौद्रकर्मप्रवर्तकः॥हरात्सक्षत्रियोविष्णुःसचराज्येप्रतिष्ठितः॥२॥ ॥टीका॥क्षत्रियाची उत्पत्ती सांगतात॥
शिवाच्या भुजापासून युद्धादि क्रूरकर्म करणारा क्षत्रिय उत्पन्न झाला॥त्याणें कर्मत्रय करावें॥दुष्टनिग्रह शिष्टपरिपाल
नार्थ विष्णुचा अंश जो क्षत्रिय त्यास राज्य प्रतिपालन करण्याविषयीं ईश्वरानी राज्याचे ठायीं स्थापन केला॥ ॥श्लोक॥
शिवस्यहृदयाद्ब्रह्मासवैश्यःपरिकीर्तितः॥कृषिगोरक्षवाणिज्यकर्मणांचप्रतिष्ठितः॥३॥ ॥टीका ॥ वैश्याची उत्पत्ती वर्णि
तात ॥ शियाचे हृदयापासून ॥ ब्रह्मदेवाचा अंशरूपी वैश्य उत्पन्न झाला ॥ त्याणे क्षत्रियाप्रमाणें कर्मत्रयाचें आचर
ण करावें॥३॥ ॥श्लोक॥शिवस्यचरणाच्चैवशूद्रवर्णसमुद्भवः॥दास्यकर्मैवशूद्राणामिंद्रादीनांतथैवच॥४॥ ॥टीका॥शू
द्राची उत्पत्ती सांगतात॥शिवाचे चरणापासून इंद्राचा अंशरूपी शूद्रवर्ण होता झाला॥त्यास वैदिककर्माधिकार नाहीं॥प

(2A)

रंतु सच्छूद्रानीं पुराणोक्त शूद्राधिकारिकधर्म ब्राह्मणापासून श्रवण करून त्याप्रमाणे धर्माचरण करावें॥ पूर्वी सांगितले
ले तीन वर्णांची सेवा करून उपजीवन करावें॥ हा त्याचा परमधर्म॥४॥ ॥ श्लोक॥ ब्राह्मणोभगवान्रुद्रोक्षत्रियःपर
मोहरिः॥ वैश्यःपितामहश्चैवइंद्रःशूद्रश्चजायते॥ ५॥ ॥टीका॥ याप्रमाणे चार वर्णांची उत्पत्ती सांगून वर्णाभिमानी
देव सांगतात॥ शिव ब्राह्मणवर्णाभिमानी॥ विष्णु क्षत्रियवर्णाभिमानी॥ ब्रह्मा वैश्यवर्णाभिमानी॥ इंद्र शूद्रवर्णाभिमानी॥
॥५॥ ॥श्लोक॥ ब्राह्मणानांचजन्मैवशिववक्त्राच्चजायते॥ पंचवक्त्रसमुत्पन्नाःपंचभिःकर्मभिर्द्विजाः॥६॥ ॥टीका॥ या री
तीने वर्णोत्पत्ती सांगून आतां शिव पांचाल ब्राह्मणाची उत्पत्ती सविस्तर सांगताहेत॥ शिव पांचाल ब्राह्मण जे ते पंच
मुखी परमेश्वर जो त्याचे पाचमुखा पासून॥ आपली जी पाचकर्मे त्या सहवर्तमान लोक हितास्तव उत्पन्न होते झालें
॥६॥ ॥श्लोक॥ मनुर्मयस्तथात्वष्टाशिल्पिकश्चतथैवच॥ दैवज्ञःपंचमश्चैवब्राह्मणाःपंचकीर्तिताः॥७॥ ॥टीका॥ शैव
पांचालाचीं पाचनावें सांगतात॥ मनु॥ मय॥ त्वष्टा॥ शिल्पी॥ दैवज्ञ॥ ह्मणोन जे पंचमुखी परमेश्वरा पासून उपन्न झाले
ते शैव पांचाल ब्राह्मण असे ग्रंथांतरी सांगितलें आहे॥७॥ ॥श्लोक॥ मनुःसंहारकर्ताचमयोवैलोकपालकः॥ त्वष्टा
चोत्पत्तिकर्ताचशिल्पिकोगृहकारकः॥८॥ दैवज्ञःस्वर्णभूषादिकर्तावैहितकाम्यया ॥ लोकानांपंचपांचालाःअभूवन्शिववक्त्र
तः॥९॥ ॥टीका॥ आता शैव पांचाल जे त्याची पाचकर्मे सांगतात॥ मनु शस्त्रादि निर्माण करून लोक संहार करणा
रा॥ मय लोकोपयोगी काष्ठमय पदार्थ निर्माण करून लोकाचे पालन करणारा॥ त्वष्टा लोक हितास्तव नानाविध पदा
र्थ उत्पन्न करणारा॥ शिल्पी गृह प्रासादादि निर्माण करणारा॥ दैवज्ञ लोकहितेच्छे करून सुवर्णमय अलंकारादिक र

"Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

चना करणारा॥या प्रकारे करून पाचकर्मे करणारे शैव पांचाल लोकहितार्थ उत्पन्न झाले॥८॥ ॥९॥ ॥श्लोक॥
पांचालानांचपंचानांवक्ष्येलक्षणमुत्तमं॥तस्यविज्ञानमात्रेणशिल्पाचारःस्फुटोभवेत्॥१०॥ ॥टीका॥शैवपांचालाचें लक्ष
ण सांगतो॥१०॥ ॥श्लोक॥ऐश्वरं मनुरूपंचमयरूपंचवैष्णवं॥ वैरिंचंत्वाष्ट्ररूपंचमाहेंद्रंशिल्पिकस्यच॥११॥रूपंनारा
यणस्यैवदैवज्ञस्यप्रकीर्तितं॥पंचरूपाणियोवेदमुच्यतेसर्वकिल्बिषात्॥१२॥ ॥टीका॥शैवपांचालाचें स्वरूप सांगताहे
त॥मनु शिवस्वरूपी आहे॥मय विष्णुरूपी॥त्वष्टा ब्रह्म रूपी॥शिल्पी इंद्ररूपी॥दैवज्ञ साक्षान्नारायण रूपी॥याप्रमा
(3) णें शैवपांचालाचें स्वरूप जो जाणतो तो सर्व पातकापासून मुक्त होतो॥११॥१२॥ ॥श्लोक॥तमोगुणोमनुश्चैवमय
सत्वगुणःस्मृतः॥रजोगुणोथत्वष्टाचाशिल्पिकस्त्रिगुणात्मकः॥१३॥ दैवज्ञःशुद्धसत्वश्चब्रह्मांडेसविजायते॥योवैगुणत्रयंवे
दमुच्यतेसर्वबंधनात्॥१४॥ ॥टीका॥शैवपांचालाचे गुण सांगतात॥मनु तमोगुणी ॥मय सत्वगुणी ॥ त्वष्टा रजोगु
णी॥शिल्पीक सत्व रज तमोगुणी॥ दैवज्ञ शुद्ध सत्वगुणी॥या रितीनें गुणत्रय जो जाणतो तो सर्व बंधनापासून मुक्त
होतो॥१३॥१४॥ ॥श्लोक॥मनुस्फटिकवर्णश्चनीलवर्णोमयःस्मृतः॥त्वाष्ट्रिकोरक्तवर्णश्चशिल्पिकोधूम्रवर्णकः॥१५॥
स्वर्णवर्णश्चदैवज्ञःपंचवर्णाःप्रकीर्तिताः॥पंचवर्णांश्चयोवेदमुच्यतेसर्वपातकात्॥१६॥ ॥टीका॥आतां शैवपांचालाचे रं
ग सांगतात॥मनु स्फटिकाप्रमाणें शुभ्र आहे॥मय नीलवर्ण॥त्वष्टा रक्तवर्ण ॥ शिल्पिक धूम्रवर्ण॥ दैवज्ञ सुवर्णापरी
पीतवर्ण॥याप्रमाणे पांचवर्ण जो जाणतो तो सर्व पातकापासून मुक्त होतो॥१५॥१६॥ ॥श्लोक ॥ मनोःकुंडंत्रिकोणं २
चचतुष्कोणंमयस्यच॥वर्तुलंत्वाष्ट्रिकंचैवषट्कोणंशिल्पिकस्यवै॥१७॥दैवज्ञस्याष्टकोणंतुपंचकुंडानितानिवै ॥ एतानिचैव

3A)

योवेदसर्वदोषाद्विमुच्यते॥१८॥टीका॥आतां शैवपांचालाचीं पांच कुंडें जीं तीं सांगताहेत॥मनूचें कुंड त्रिकोण आहे॥मयाचें कुंड चतुष्कोण आहे॥त्वाष्ट्रिकाचें कुंड वर्तुल आहे॥शिल्पिचें कुंड षट्कोण आहे॥दैवज्ञाचें कुंड अष्टकोण आहे॥या रितीनें पंचकुंडें जो जाणतो तो पापापासून मुक्त होतो॥१७॥१८॥ ॥श्लोक॥रजतस्यमनोर्दंडोवेणुदंडोमयस्यच॥त्वाष्ट्रस्यताम्रदंडश्चलोहदंडश्चशिल्पिनां॥१९॥सुवर्णदंडआख्यातोदैवज्ञस्यागमात्मकैः॥पंचदंडांश्चयोवेदमुच्यतेसर्वतोभयात्॥२०॥ ॥टीका॥आतां त्यांचे दंड सांगतात॥मनूचा रुप्याचा दंड आहे॥मयाचा दंड वेळूचा॥त्वष्टा जो त्याचा दंड तांब्याचा॥शिल्पीचा दंड लोहाचा॥दैवज्ञाचा दंड सोन्याचा आहे॥या रितीनें शैवपांचालाचे पंचदंड जो जाणील तो सर्व भयापासून मुक्त होतो॥१९॥२०॥ ॥श्लोक॥रजतस्यमनोःसूत्रंपद्मसूत्रंमयस्यच॥ताम्रसूत्रंत्वाष्ट्रिकस्यकार्पासंशिल्पिकस्यच॥२१॥दैवज्ञस्यसमाख्यातंस्वर्णसूत्रंमहर्षिभिः॥पंचसूत्राणियोवेदसर्वपापैःप्रमुच्यते॥२२॥ ॥टीका॥शैवपांचालाचीं सूत्रें सांगतात॥मनूचें सूत्र रौप्यमय आहे॥मयाचें कमल सूत्र आहे॥त्वष्टा जो त्याचें ताम्र सूत्र आहे॥शिल्पीचें कार्पास सूत्र आहे॥दैवज्ञाचें सूत्र सोन्याचें आहे॥याप्रमाणें पंचसूत्रें जो जाणतो तो सर्व पातकापासून मुक्त होतो॥२१॥२२॥ ॥श्लोक॥अयसांचमनुःकर्ताकाष्ठकारोमयःस्मृतः॥त्वाष्ट्रिकःकांस्यकर्ताचशिलाकर्ताचशिल्पिकः॥२३॥दैवज्ञःस्वर्णकारश्चपंचानांकर्मपंचकं॥योवेदपंचकर्माणिसर्वपापैःप्रमुच्यते॥२४॥ ॥टीका॥शैवपांचालाचीं पंचकर्में सांगतात॥मनू लोहमय पदार्थ निर्माण करणारा॥मय काष्ठमय पदार्थ निर्माण करणारा॥त्वष्टा कांस्यपदार्थ निर्माण करणारा॥शिल्पि शिलामय पदार्थ निर्माण करणारा॥दैवज्ञ सुवर्णमय पदार्थ निर्माण करणारा॥

Joint Project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

हीं पंचकर्मै जो जाणतो तो पापापासून मुक्त होतो ॥२३॥२४॥ ॥श्लोक॥ ऋग्वेदश्चमनोश्चैवयजुर्वेदोमयस्यच ॥ साम वेदस्त्वाष्ट्रिकस्यत्वथर्वाशिल्पिकस्यच ॥ २५ ॥ सुषुम्नाभिधवेदोसौदैवज्ञानांप्रकीर्तितः ॥ पंचवेदांश्चयोवेदसायुज्यंलभते नरः ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ आतां शैवपांचालाचे ॥ पांच वेद सांगतात ॥ ऋग्वेद मनूचा ॥ यजुर्वेद मयाचा ॥ त्वष्ट्या चा सामवेद ॥ अथर्वणवेद शिल्पिचा ॥ सुषुम्नाख्यवेद दैवज्ञाचा आहे ॥ या रीतीनें पंचवेद जो जाणतो तो शिवसायु ज्य पावतो ॥ २५ ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ पांचालानांचसर्वेषांवर्णानांचतथैवच॥ उत्पत्तिंसंप्रवक्ष्यामिलोकानांहितकाम्य या ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ याप्रमाणें शैवपांचाल माहात्म्य समाप्त झालें ॥ या रितीनें पंचमुखी परमेश्वर जो त्याचे मु खापासून शैवपांचालांची उत्पत्ती सविस्तर सांगून आतां च्यार वर्ण व ब्रह्मपांचाल व उपपांचाल यांची सृष्टी ब्रह्मदेवा पासून झाली ती लोकहितास्तव सविस्तर सांगतों ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ विश्वकर्मनिदेशेनपुरासृष्टाविरंचिना ॥ च त्वारोमनवोलोकानिर्मितासृष्टिहेतवे ॥ २८ ॥ योविरंचिःसवैराजाप्रजापतिरुदारधीः ॥ अंतरालेगणानांचवरिष्ठोलोकका रकः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ब्रह्मसृष्टी सांगतात ॥ विश्वकर्म्याच्या आज्ञेकरून देवगणामध्यें वरिष्ठलोक निर्माण कर णारा ॥ वैराजशब्दवाच्य ब्रह्मदेव जो त्याणें प्रजा सृष्टीकरितां ॥ चवदा लोक उत्पन्न करून त्यांत स्वायंभूव स्वारो चिष रैवत तामस ॥ असे चवघे मनु उत्पन्न केले ॥ २८ ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ वैराजस्यमुखाज्जज्ञेविप्रःस्वायंभुवोम नुः ॥ स्वारोचिषोमनुःक्षत्रीब्रह्मणोबाहुमंडलात् ॥ ३० ॥ रैवताख्योमनुर्वैश्योवैराजस्योरुमंडलात्॥तामसाख्योमनुःशू द्रोवैराजस्यांघ्रिमंडलात् ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ क्रमेंकरून मनूची सृष्टी ब्रह्मदेवापासून झाली ती सांगतात ॥ वैराज ब्र

The Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan

ह्मा जो याचे मुखापासून ब्राह्मण वर्णाची सृष्टी करणारा स्वायंभुव मनू उत्पन्न झाला ॥ तो स्वायंभुव मनू ब्राह्मण आ-
हे ॥ क्षत्रियरूपी आणि क्षत्रिय वर्णाची सृष्टि करणारा स्वारोचिष मनू वैराज ब्रह्मा जो त्याचा बाहुमंडलापासून उ
त्पन्न झाला ॥ वैश्यरूपी आणि वैश्यवर्णाची सृष्टि करणारा रैवत मनू जो तो वैराजाचे मांडीपासून उत्पन्न झाला॥
शूद्ररूपी आणि शूद्रवर्णाची उत्पत्ती करणारा तामस मनू वैराजाचे पायापासून उत्पन्न झाला ॥ ३० ॥ ३१ ॥ ॥
॥ श्लोक ॥ स्वायंभुवस्यषट्पुत्राज्येष्ठोथर्वाप्रकीर्तितः ॥ सामवेदोयजुर्वेदःक्रमादृग्वेदएवच ॥ ३२ ॥ वेदव्यासःपंचमोथ
प्रियव्रतउदीरितः ॥ एतेषण्मुख्यविप्राश्चउपविप्रानथशृणु ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ आतां स्वायंभुव मनू जो त्याची संत
ती सांगतात ॥ स्वायंभुव मनूस अथर्वणवेद ॥ सामवेद ॥ यजुर्वेद ॥ ऋग्वेद ॥ वेदव्यास ॥ प्रियव्रत असे साहा
पुत्र मुख्य ब्राह्मण उत्पन्न झाले ॥ ३२ ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ आद्यःशिलपायनश्चैवगौरवायनएवच ॥ कायस्थायन
आख्यातस्ततोवैमागधायनः ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ स्वायंभुव मनूपासून चवघे उपब्राह्मण झाले ते सांगतात ॥ शि
ल्पायन ॥ गौरवायन ॥ कायस्थायन ॥ मागधायन ॥ ह्मणोन चवघे पुत्र उपब्राह्मण त्यापासून उत्पन्न झाले ॥
॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ अथर्वादयआद्याश्चमनोःस्वायंभुवस्यते ॥ षट्पुत्रामुख्यविप्राश्चकथितावेदवादिभिः ॥ ३५ ॥
ऋग्वेदादिकवेदानामेषामध्ययनंस्मृतं ॥ तेमुख्यवेदिनःसर्वेमुख्यब्राह्मणसंज्ञकाः ३६ ॥ ॥ टीका ॥ स्वायंभुव मनूचे
जे साहा पुत्र त्याचे वेद सांगतात ॥ स्वायंभुव मनूचे पहिले साहा पुत्र मुख्य ब्राह्मण ह्मणोन ऋषी कथन करितात॥
आणि त्योणि ऋग्वेदादि चतुर्वेद जे त्याचें अध्ययन करावें त्यास मुख्यवेदी ह्मणावें ॥ ३५ ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥

(5)

स्वायंभुवमनोःपुत्राःप्रोक्ताःशिल्पायनादयः ॥ चत्वारोउपविप्राश्चकथितावेदवादिभिः ॥ ३७ ॥ आयुर्वेदादिवेदानामेषाम ध्ययनंस्मृतं ॥ तेचोपवेदिनःसर्वेउपब्राह्मणसंज्ञकाः ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ उपपांचाल ब्राह्मण जे त्याचे वेदादिक सांगता हेत ॥ शिल्पायनादिक जे स्वायंभुव मनूचे चवघे पुत्र ते उपवेदी आणि उपब्राह्मण ह्मणावे ॥ आणि त्यास ॥ आयुर्वेद ॥ धनुर्वेद ॥ गांधर्ववेद ॥ शिल्पिवेद ॥ असे च्यार उपवेद आहेत ॥ त्यांचें अध्ययन त्या चवघास विहित आहे ॥ ॥ ३७ ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ब्राह्मणानांशिखासूत्रंमुख्यानांपरिकीर्तितं ॥ तथाचैवोपविप्राणांविहितंचविरंचिना ॥ ३९ ॥ मुख्यानांब्राह्मणानांचगायत्रीश्रवणंखलु ॥ तथाचैवोपविप्राणांगायत्रीश्रवणंस्मृतं ॥ ४० ॥ मुख्यानांब्राह्मणानांचतथाचैवो पवेदिनां ॥ संध्याविधिरुपास्योयंविहितोथविरंचिना ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ आतां मुख्य ब्राह्मण उपब्राह्मण यांचे साधार ण धर्म सांगतात ॥ मुख्य पांचाल उपपांचाल याणी शिखा यज्ञोपवीत धारण व गायत्री श्रवण आणि संध्योपासना करावी ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ अथर्वणस्योपवेदःशिल्पिवेदःप्रकीर्तितः ॥ तस्मादाथर्वणाःप्रोक्ताःसर्वेशिल्पिन एवच ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ अथर्वणवेदाचा उपवेद सांगतात ॥ शिल्पवेद अथर्वण वेदाचा उपवेद आहे ॥ त्याचें अध्य यन करितात ॥ यास्तव समस्त शिल्पि अथर्वण असें नाम पावताहेत ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ शिल्पायनस्ययेपुत्रास्तेषु ज्येष्ठश्चलोहकृत् ॥ सूत्रधारःप्रस्तरारिस्ताम्रकारःसुवर्णकः ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ स्वायंभुव मनूचे चवघे पुत्र उपपांचाल जे त्यांपैकीं ज्येष्ठपुत्र जो शिल्पायन त्याची संतति सांगतात ॥ लोहार ॥ सुतार ॥ पाथरवट ॥ तांबट ॥ सोनार ॥ ह्म णोन जे शिल्पायनाचे पांच पुत्र लोकोपयोगार्थ शिल्पायनापासून उत्पन्न झाले ॥ ते सर्व पांचाल ह्मणोन शास्त्रांत उ

क आहे ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ पांचालानांचसर्वेषांशाखावैविश्वकर्मणी ॥ तेषांवैपंचगोत्राणांप्रवरंपंचकंस्मृतं ॥ ४४ ॥ तेषांवैरुद्रदैवत्यंत्रिष्टुप्छंदस्यएवच ॥ मुख्यानांब्राह्मणानांचपांचालानांचप्रकीर्तितः ॥ ४५ ॥ शिल्पवेदश्चशिल्पानांपंचानांपरिकीर्तितः ॥ अध्ययनंचतत्रैवसंहितापंचकंस्मृतं ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ आतां समस्त पांचालाची शाखादिक सांगताहेत ॥ समस्त पांचाल जे त्याची विश्वकर्म शाखा ग्रंथांतरीं प्रसिद्ध आहे ॥ आणि कौंडण्यगोत्र ॥ अत्रेयगोत्र ॥ भारद्वाजगोत्र ॥ गौतमगोत्र ॥ काश्यपगोत्र ॥ ह्मणोन पांच पांचालाचीं पांच गोत्रें प्रसिद्ध आहेत ॥ सद्योजातप्रवर ॥ वामदेवप्रवर ॥ आघोरप्रवर ॥ तत्पुरुषप्रवर ॥ ईशानप्रवर ॥ पाचाचे पाच प्रवर क्रमेंकरून विहित आहेत ॥ आणि आश्वलायन सूत्र ॥ आपस्तंब सूत्र ॥ बौधायन सूत्र ॥ दाक्षायण सूत्र ॥ कात्यायन सूत्र ॥ ह्मणोन पाचाची क्रमेंकरून पाच सूत्रें आहेत ॥ त्यास रुद्रदैवत्य त्रिष्टुप्छंद रुद्रगायत्री विहित आहे ॥ आणखी त्याणी शिल्पवेदाची पाच संहिता जे त्याचे अध्ययन करावें ॥ ४४ ॥ ४५ ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ शिल्पायनसुतोज्येष्ठोमनोःशिष्यत्वमाददात् ॥ पपाठसंहितामाद्यांधातुवेदस्यलोहकृत् ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ शिल्पायनाचा ज्येष्ठपुत्र जो लोहकार त्याचें अध्ययन सांगतात शिल्पायनपुत्र लोहकार मनूचा शिष्य होऊन त्यापासीं धातुवेद संहितेचे अध्ययन करिताझाला ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ सूत्रधारोद्वितीयोथमयशिष्यत्वमाददात् ॥ संहितांसूत्रधाराख्यामपठत्कोकमेवच ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ सूत्रधाराची सांहिता सांगतात ॥ सूत्रधार मयाचा शिष्य होऊन त्यापासीं सूत्रधारसंहिता व कोकशास्त्र याचें अध्ययन करिताझाला ॥ ४८ ॥ श्लोक ॥ शिल्पायनसुतस्तक्षाशिल्पेःशिष्यत्वमाददात् ॥ सशैलसंहितांतस्मात्पपाठभृगुनंदन ॥ ४८ ॥ टीका

" Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

शिलाकार संहिता सांगतात ॥ शिलाकार शिल्पीचा शिष्य होऊन त्यापासीं शैलसंहितेचें अध्ययन करिताझाला ॥ ४९ ॥ श्लोक ॥ अथताम्रकारःशिष्यःशिल्पिकस्याभवत्पुरा ॥ शिल्पायनसुतस्तुर्यस्त्वपठत्ताम्रसंहितां ॥ ५० ॥ टीका ॥ ताम्रकार संहिता सांगतात ॥ ताम्रकार त्वाष्ट्रिकाचा शिष्य होऊन त्यापासीं ताम्रसंहिता अध्ययन करिताझाला ॥ ५० ॥ श्लोक ॥ नार्डिंधमोथशिष्योभूद्दैवज्ञस्यैवपंचमः ॥ सुतःशिल्पायनस्यैवपपाठस्वर्णसंहितां ॥ ५१ ॥ टीका ॥ स्वर्णकारसंहिता सांगतात ॥ स्वर्णकार जो तो दैवज्ञाचा शिष्य होऊन त्यापासी सुवर्णसंहिता अध्ययन करिताझाला ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ पांचालानांचसर्वेषांसंहितापंचकस्यच ॥ अभूदध्ययनंसौम्यंपंचब्रह्मप्रकीर्तितं ॥ ५२ ॥ पठिताःसर्वपांचालाःविश्वकर्मसशाखिनः ॥ पांचालामानवाएतेएतेषांसंततिस्तथा ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ आतां समस्तपांचालासही पांच संहितेचेठाईं अधिकार सांगतात ॥ समस्त पांचालानी शिल्पिवेदाची पांच प्रकारची संहिता जी त्याचें अध्ययन करावें ॥ आणि विश्वकर्म शाखीय जे काही त्या शिल्पिवेदाचे पांच प्रकारचे संहितेचें अध्ययन करितील ॥ ते व त्याची पुत्र पौत्रादि संततीही मृत्युलोकाचेठाईं पांचालब्राह्मण असें नाम पावतील ॥ ५२ ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ मृत्युलोकेचते सर्वेउपब्राह्मणसंज्ञकाः ॥ अथैषांदेवताःपंचविश्वकर्ममुखोद्भवाः ॥ ५४ ॥ मनुर्मयस्तथात्वष्टाशिल्पिकश्चतथैवच ॥ दैवज्ञःपंचमःप्रोक्ताःस्वर्गस्थायज्ञपोषकाः ॥ ५५ ॥ ॥ टीका ॥ आता पांचालजातीची देवता सांगतात ॥ मृत्युलोकीं पांचालजातीस उपब्राह्मण ह्मणावे ॥ विश्वकर्माजो त्याच्या मुखापासून उत्पन्न झाले जे मनु मय त्वष्टा शिल्पी दैवज्ञ ह्मणोन पाच पांचाल आहेत ॥ ते स्वर्गी राहुन यज्ञाचें रक्षण करून पांचाल जातीचे मनोरथ पुरवितात ॥ याजकारि

(6A)

तां समस्त पांचाल जातीस ते पांच उपास्य देवता आहेत ॥ ५४॥५५ ॥ ॥ श्लोक ॥ पांचालानांचसर्वेषांआचारइ तिगीयते ॥ अष्टांगयोगःषट्कर्मपंचयज्ञाइतिश्रुतिः ॥ ५६ ॥ ॥टीका ॥ आतां पांचालजातीचे आचार वगैरे सांगतात ॥ यम नियम आसन प्राणायाम प्रत्याहार ध्यान धारणा समाधि ह्मणोन अष्टांग योग आणि षट्कर्म व पंचमहायज्ञ पांचाल जातीस वेदामध्यें उक्त आहेत ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ यजनंयाजनंचैवतथाचाध्ययनंस्मृतं॥ अध्यापनंततःप्रोक्तंतथादानंप्रतिग्रहः ॥ ५७ ॥ स्नानंसंध्यात्रिकालेषुअग्निहोमंतथैवच ॥ षट्कर्माण्येवमेतानिपांचालानांस्मृतानिच ॥ ५८ ॥ ॥ टीका ॥ आतां पांचाल जातीस षट्कर्मे जीं सांगीतलीं तें षट्कर्म सांगताहेत ॥ यजन ह्मणजे आपण यज्ञ करावे ॥ याजन ह्मणजे दुसऱ्यापासून यज्ञ करविणें ॥ अध्ययन ह्मणजे आपण वेद पढणें ॥ अध्यापन ह्मणजेदुसऱ्यास आपण वेद सांगणें ॥ दान ह्मणजे परलोकार्थ द्रव्य सत्पात्रीं देणे ॥ प्रतिग्रह ह्मणजे दुसरा परलोकार्थ द्रव्य देयील तें घेणें ॥ याप्रमाणें यजन याजन अध्ययन अध्यापन दान प्रतिग्रह ह्मणोन षट्कर्म आणि प्रातःकाळ माध्यानकाळ संध्याकाळ ह्मणोन त्रिकाल जे त्याचेठाईं स्नान व संध्यावंदन व अग्नीचेठाईं होम पांचालानी करावे ॥ ५७॥५८॥ ॥ श्लोक ॥ ॥ नित्यंनैमित्तिकंकर्मद्विजातीनांयथाक्रमं ॥ पितृयज्ञंभूतयज्ञंदैवयज्ञंतथैवच ॥ ५९ ॥ ॥ टीका ॥ आतां पांचाल जातीस विहित जें नित्यनैमित्तिक कर्म त्याचें निरूपण करिताहेत ॥ नित्यकर्म ह्मणजे जें कर्म केलेंअसतां विशेष फल नाहीं॥ आणि त्याग केलाअसतां प्रत्यवाय घडून पतीत होतो तें नित्यकर्म ह्मणावें ॥संध्यावंदनादिक जें तें नित्यकर्मह्मणावें॥ त्याचा त्याग केलाअसतां प्रत्यवाय आहे॥ केलेंअसतां विशेष फल नाहीं॥ नैमित्तिक कर्म ह्मणजे जें

कर्म केलेंअसतां आपली कामना पूर्ण होती तें नैमित्तिककर्म ह्मणावें॥व्रतादिकाचें आचरण केलेंअसतां कामना पूर्ण होती॥याजकरितां व्रतादिक नैमित्तिककर्म आहे॥असें नित्य नैमित्तिककर्म जे तें पांचालानी करावे॥५९ ॥ ॥श्लोक ॥ जपयज्ञंब्रम्हयज्ञंपंचयज्ञांश्चरंतिवै ॥ एवंत्रिविधमाचारंकर्तारस्तेद्विजातयः ॥६०॥इतिश्रीशैवागमेपांचालमाहात्म्यंस मात्तं ॥ ॥टीका॥ पंचमहायज्ञ सागतात ॥ पितृयज्ञ म्हणजे पितृप्रीत्यर्थ निरंतर पितृतर्पण व श्राद्ध ॥ अतिथीपूज न हे पितृयज्ञ म्हणावे ॥ बलिहरणादिक जे ते भूतयज्ञ म्हणावे ॥ देवता पूजनादिक देवयज्ञ ह्मणावे ॥ गायत्री जपा दिक जपयज्ञ ह्मणावे॥देवतातर्पणादिक जे ते ब्रह्मयज्ञ ह्मणावे ॥ याप्रमाणें पंचमहायज्ञ आणि षट्कर्म व अष्टांगयो ग ह्मणोन तीन प्रकारचें कर्माचरण समस्त पांचालानी करावें॥६०॥ ॥ इतिश्रीलिंगपु॰शैवागमोक्तपांचालमाहात्म्ये प्राकृतटीकामंदबोधिनीपरिसमाप्तिमगमत् ॥ ॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ इति शैवागम समाप्तः ॥

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com